प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी किसरा, कैसर, आणी नज्जाशी तसेच प्रत्येक जुलुमी बादशाह ला सर्वोच्च अल्लाह कडे निमंत्रण देण्या करिता पत्र पाठविले

हजरत अनस रजिअल्लाहु अनहु कथन करतात की: प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी किसरा, कैसर, आणी नज्जाशी तसेच प्रत्येक जुलुमी बादशाह ला सर्वोच्च अल्लाह कडे निमंत्रण देण्या करिता पत्र पाठविले, परंतु हा तो नज्जाशी नव्हता, ज्याच्यावर प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी म्रॄत्युपरांत नमाज अदा केली.
[صحيح] [رواه مسلم]

अनस बिन मालीक रजिअल्लाहु वर्णन करतात की, प्रेषित सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी आपल्या म्रुत्यु पुर्वी आपल्या आसपासच्या परिसरातील बादशाहांना ईस्लाम चे निमंत्रणा करिता पत्रे पाठविली, प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी किसरा ला पत्र पाठवले, जी फारस म्हणजे ईराण च्या शासकाची पदवी होती, आणी कैसर ला पत्र पाठवले, जी रोम च्या बादशाह ची पदवी होती, त्याचप्रमाणे नज्जाशी ला सुद्धा पत्र पाठविले, जी हब्शा म्हणजे ईथोपिया च्या बादशाह ची पदवी होती. याचप्रमाणे प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी समकालीन जुलुमी व अत्याचारी हुकुमशहांना पत्रे पाठविली, जे प्रजेवर अन्याय व अत्याचार करत होते, अनस रजिअल्लाहु अनहु सविस्तर माहिती देत आहेत की, ज्या नज्जाशी ला पत्र पाठवले, तो नव्हता ज्याने नंतर ईस्लाम चा स्वीकार केला व मरण पावला होता, आणी ज्याच्यावर प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी त्याच्यासाठी अद्रॄष्य (गायबाना) नमाज अदा केली होती.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/65789